


अठ्ठाविसावा

महाराष्ट्र राज्य

मराठी चित्रपट महोत्सव

# पारितोषिक वितरण समारंभ

दिनांक १ मे १९९१

रंगभवन, धोबीतलाव, मुंबई

सायंकाळी ७-०० वाजता

Scanned with OKEN Scanner

# अठ्ठाविसावा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सव पारितोषिक वितरण समारंभ

९ मे १९९१

## पारितोषिक वितरण

मा. ना. श्री. सुधाकरराव नाईक
महसूल व सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य

यांच्या हस्ते

प्रमुख अतिथी

मा. ना. श्री. अरुण मेहता
गृह व सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

Scanned with OKEN Scanner



मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ११ एप्रिल १९९१

चित्रपट हे जनसंपर्काचे, लोकशिक्षणाचे आणि मनोरंजनाचे अत्यंत प्रभावी साधन आहे. म्हणूनच त्याची हाताळणी विचारपूर्वक, समंजसपणे होणे महत्त्वाचे आहे. समाजातील खलप्रवृत्ती आणि चांगल्या प्रवृत्ती ह्या गोष्टी अनादी कालापासून अस्तित्वात आहेत. समाज हा विकृती आणि प्रवृत्ती या दोन्हींनी मिळून होतो. त्यातील विकृतीच तेवढी शोधणे, क्वचित तिचे उदात्तीकरण करणे या गोष्टी समाजधारणेस अत्यंत घातक ठरतील. याउलट, सत्यं-शिवं-सुंदरं या शाश्वत मूल्यांचा विजय दाखवणे, त्यांचा ध्यास घेण्याची प्रेरणा देणे, समाजाची जडणघडण करायाला अत्यंत उपयुक्त ठरेल. या मूल्यांचे अधिष्ठान ठेवून केलेली कलाकृती स्थळकाळाच्या मर्यादा ओलांडून चिरस्थायी ठरते. म्हणूनच काही चित्रपट कित्येक दशकांनंतर त्यांच्या बारकाव्यांसह प्रेक्षकांच्या लक्षात राहतात, तर काही चित्रपट चित्रपटगृहाच्या बाहेर पडण्यापूर्वीच प्रेक्षक विसरून जातो.

अठ्ठाविसाव्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात पारितोषिक पात्र ठरलेल्या चित्रपट निर्मात्यांचे, कलावंतांचे आणि तंत्रज्ञाचे मनःपूर्वक अभिनंदन. स्पर्धेसाठी येणाऱ्या माहितीपटांच्या संख्येतही वाढ झाली पाहिजे. लहान मुलांसाठी, युवकांसाठी, त्यांना बहुश्रुत करतील, ज्ञानसंपन्न करतील असे दर्जेदार माहितीपट मोठ्या संख्येने निघाले पाहिजेत. यापुढील स्पर्धांना आजवर मिळाला त्यापेक्षा खूप मोठा प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

अठ्ठाविसाव्या चित्रपट महोत्सवास माझ्या हार्दिक शुभेच्छा!

शरद पवार



Scanned with OKEN Scanner

**मंत्री**
महसूल, संसदीय कार्य आणि सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ११ एप्रिल १९९१



महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ आणि पुरस्कारप्राप्त चित्रपटांचा महोत्सव आयोजित करण्यात आला असून त्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित केली जात आहे हे वाचून आनंद वाटला.


चित्रपट हे समाजजागृती आणि सामाजिक अभिसरणाचे अतिशय प्रभावी आणि परिणामकारक माध्यम आहे. विशेषतः मराठी चित्रपटांनी अनेक सामाजिक प्रश्न समाजासमोर मांडून लोकांना विचारप्रवृत्त करण्याचे कार्य केले आहे. कोणतीही कला ही जेव्हा समाज जीवनातील समस्यांशी एकरूप होऊन प्रकट होते, तेव्हा ती खऱ्या अर्थाने यशस्वी होत असते. आणि असे अनेक यशस्वी चित्रपट मराठीत निर्माण झालेले आहेत. चित्रपटांचा हा वारसा जतन करावा आणि ह्या क्षेत्रात काम करणाऱ्या कलावंतांना प्रोत्साहन द्यावे ह्या हेतूने शासन दरवर्षी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करीत असते. गेली २८ वर्षे हे कार्य अव्याहत सुरू असून त्याचा चित्रपटसृष्टीला निश्चित फायदा झाला आहे. मराठी चित्रपटांच्या प्रगतीच्या दृष्टीने ही योजना अशीच यशस्वीपणे राबविली जाईल आणि त्यातून कलावंत, दिग्दर्शक, निर्माते, तंत्रज्ञ, साऱ्यांनाच प्रोत्साहन मिळेल अशी खात्री आहे.

पारितोषिक वितरण समारंभ, चित्रपट महोत्सव आणि स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा !

सुधाकरराव नाईक



Scanned with OKEN Scanner



राज्यमंत्री
गृह (तुरुंग यासह), कामगार, संसदीय कार्य
सेवायोजन आणि सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ६ एप्रिल १९९१

यंदाच्या वर्षी घेण्यात आलेल्या मराठी चित्रपट महोत्सवात पुरस्कारप्राप्त चित्रपटांचा महोत्सव आणि पारितोषिक समारंभ मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात आला असल्याचे वाचून आनंद वाटला.

महाराष्ट्र ही भारतीय चित्रपटांची जननी आहे आणि मराठी चित्रपटांनी तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि कलात्मक जीवनाची जडण-घडण केली आहे. आणि हा कलात्मक वारसा जतन करून त्याला प्रोत्साहन द्यावे ह्या हेतूने शासनाने ज्या अनेक योजना आखल्या आहेत, त्यांत चित्रपट महोत्सव ही एक महत्त्वाची योजना आहे. गेल्या अठ्ठावीस वर्षांच्या काळात या महोत्सवातून अनेक गुणी कलावंत आणि तंत्रज्ञ उदयाला आलेले आहेत. ही प्रक्रिया सातत्याने चालू राहील व मराठी चित्रपटसृष्टी सर्वार्थाने प्रगत होऊन राष्ट्रीय स्तरावरही सन्मानाचे स्थान मिळवील अशी खात्री आहे.

या वर्षीच्या चित्रपट महोत्सवातील यशस्वी पुरस्कर्त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो व त्यांच्या कलेचा फायदा चित्रपटसृष्टीला दीर्घकाळ मिळेल अशी आशा व्यक्त करतो.

महोत्सवानिमित्त प्रकाशित होत असलेल्या स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा !

अरुण मेहता



Scanned with OKEN Scanner

**मुख्य सचिव**
**महाराष्ट्र शासन**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
दिनांक १८ एप्रिल १९९१



मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार, निर्माते, तंत्रज्ञ इत्यादींच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि मराठी चित्रपटांच्या उत्तमोत्तम कलाकृती निर्माण व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे "मराठी चित्रपट महोत्सव" आयोजित केला जातो. या वर्षीच्या २८ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवातील पारितोषिक वितरण समारंभ शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित केला आहे.


अशा उपक्रमांमुळे मराठी चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन तर मिळेलच, परंतु भावी काळात उत्तमोत्तम कलाकार-तंत्रज्ञ निर्माण होण्यास मदत होईल. मराठी चित्रपटांचे कार्यक्षेत्र जरी मर्यादित असले तरी राज्याच्या सीमा ओलांडून देशभर गौरवास पात्र अशा कलाकृतींच्या निर्मितीस यामुळे हातभार लागणार आहे.

हा समारंभ आयोजित केल्याबद्दल सांस्कृतिक कार्य संचालनालयास तसेच यशस्वी चित्रपट निर्माते, कलाकार, तंत्रज्ञ इत्यादींना मी सुयश चिंतितो व त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

कृ. भा. श्रीनिवासन



Scanned with OKEN Scanner



समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
मंत्रालय विस्तार भवन
मुंबई ४०० ०३२
दिनांक १६ एप्रिल १९९१

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने यावर्षी घेण्यात आलेल्या मराठी चित्रपट महोत्सवात पुरस्कारयोग्य ठरलेल्या चित्रपटांचा महोत्सव आणि पारितोषिक वितरण समारंभ मे, १९९१ च्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात आला असून त्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित होत आहे, हे योग्यच आहे.

महाराष्ट्राच्या कलेचा आणि संस्कृतीचा वारसा जतन करावा, जोपासावा आणि विकसित करावा म्हणून महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच जाणीवपूर्वक राज्य शासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. मराठी चित्रपट उद्योगाच्या विकासाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने आतापर्यंत अनेक योजना हाती घेऊन त्यांची यशस्वी रीत्या अंमलबजावणी केलेली आहे आणि ह्या योजनांची मराठी चित्रपटांच्या निर्मितीला आणि चित्रपट व्यवसायाच्या विकासाला खूपच मदत झाली आहे. अर्थात त्यामुळे मराठी चित्रपट उद्योजकांच्या सर्व समस्या सुटल्या आहेत असे नाही. अजूनही अनेक महत्त्वाच्या समस्या मराठी चित्रपट उद्योगाला भेडसावीत आहेत व त्यातून आपल्याला मार्ग काढण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे लागणार आहेत. मराठी चित्रपट उद्योजक व संबंधित व्यक्ती आणि शासन यांच्या परस्पर सहकार्यातून ह्या समस्या सुटतील आणि मराठी चित्रसृष्टी ही पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि कलात्मक संपन्नतेचा वारसा साऱ्या देशात पोहोचविल, अशी मला खात्री आहे.

महोत्सव, पारितोषिक वितरण समारंभ व स्मरणिका यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**वेंकट चारी**
सचिव, सांस्कृतिक कार्य



Scanned with OKEN Scanner

**अध्यक्ष**

**अ. भा. मराठी चित्रपट महामंडळ**

दिनांक २० एप्रिल १९९१



सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे गेली २८ वर्षे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देत आहे. कै. यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या चित्रपट महोत्सवामुळे मराठी चित्रपट व्यवसाय आज हिंदीच्या स्पर्धेत तग धरून राहिला आहे. महाराष्ट्र शासनाच्या करपरतीच्या योजनेमुळे हा व्यवसाय येथून पुढे टिकू शकणार आहे. वेळोवेळी महाराष्ट्र शासन मराठी चित्रपटाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल अ. भा. मराठी चित्रपट महामंडळातर्फे मी कृतज्ञता व्यक्त करतो.

पारितोषिक विजेत्या सर्व कलाकार-तंत्रज्ञांचे हार्दिक अभिनंदन !

**रामदास फुटाणे**



Scanned with OKEN Scanner



**व्यवस्थापकीय संचालिका**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि
सांस्कृतिक विकास महामंडळ, मुंबई
दिनांक १८ एप्रिल १९९१

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाची व्यवस्थापकीय संचालिका म्हणून मराठी चित्रपटांशीच नाही तर सर्वच चित्रपट व्यवसायाशी महामंडळाचा फार जवळचा संबंध आहे. महामंडळाची स्थापना ही मराठी चित्रपटांच्या समृद्धीसाठीच झालेली असल्यामुळे चित्रपट महोत्सवाचा एक वेगळाच आनंद महामंडळास होतो. जुन्या मराठी चित्रपटांची कीर्ती व गुणवत्ता इतकी श्रेष्ठ असावयाची की त्यांनी प्रेरीत होऊन इतर भाषांतील व हिंदीतील अनेक चित्रपट निघावयाचे. मराठी गाणी, मराठी गायक व मराठी संगीतकार यांनी अनेक वर्षे आपल्या चित्रपटांवर व जनमानसावर मोहिनी घातली आहे.

कै. दादासाहेब फाळके व कै. व्ही. शांताराम यांच्यासारख्या प्रभृतींनी मराठी चित्रपटासाठीच नव्हे तर भारतीय चित्रपटसृष्टीसाठी फार मोठे कार्य केले. मराठी चित्रपटांची जुनी परंपरा नवीन आलेल्या तरुण, सुशिक्षित व प्रयोगशील निर्मात्यांनी व दिग्दर्शकांनी आणखीन उज्ज्वल करावी. आजच्या काळात चित्रपटात येणारे कलाकार हे अत्यंत बुद्धिमान व अभिनयात विविधता तसेच नैपुण्य असलेले आहेत. त्यांना जगातील इतरही विकसित रंगभूमी आणि थिएटरच्या अनुभवांचा फायदा मिळतो. या अनुभवांनी व ज्ञानाने मराठी चित्रपटही अधिकाधिक कलात्मक व मनोरंजक होत राहोत. मराठी चित्रपटांनी आपली दिगंत कीर्ती अशीच दैदिप्यमान ठेवावी व हाच आपल्या राज्याचा अभिमानाचा बिंदू ठरो ही या महोत्सवाच्या निमित्ताने प्रार्थना.

**नीला सत्यनारायण**

# अठ्ठावीस वर्षांपूर्वी....



**श्री. रवींद्र सुर्वे**
संचालक सांस्कृतिक कार्य

"एकोणीसशे त्रेसष्ठमधली पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमाची रात्र मला अजून देखील आठवते. मी त्यावेळी अगदी हिच्या वयाचा-पाच वर्षांचा होतो".

कालच्या मराठी चित्रपट सृष्टीतील बालकलाकार व आजचा यशस्वी निर्माता, दिग्दर्शक व अभिनेता, परंतु अजूनही बालकाचा लोभस निरागसपणा चेहऱ्यावर वागवणारा सचिन सांगत होता, आणि 'ही' समोर आपल्या बाळमुठीवर गोबरे गाल टेकवून ऐकत होती, ती सत्ताविसाव्या मराठी चित्रपट महोत्सवातील उत्कृष्ट बालकलाकाराचे पारितोषिक घेतलेली 'कळत नकळत' मधील 'मनू' मृण्मयी चांदोरकर.

गेल्या वर्षीच्या, सत्ताविसाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमानंतरची गोष्ट. औरंगाबादच्या सुभेदारी विश्रामगृहात सर्व बिनीचे मराठी चित्रपट कलावंत आणि तंत्रज्ञ बसले होते आणि सचिन आठवणींत बुडून गेला होता. बोलता बोलता आपल्या बालपणाच्या आठवणीने त्याला हसू येत होतं. "मला खूप झोप येत होती. . . " सचिन पुढे म्हणाला, "पण मी स्टेजवर आहे याची जाणीवही होती. हातात बक्षिसाचं पाकीट होतं -- ५०० रुपयांचं, कार्यक्रम लांबत चालला होता. शेवटी मला रहावेना आणि मी ते पाकीट स्टेजवरच हळूच उघडून पाहिलं. शंभर रुपयांच्या पाच नोटा होत्या. त्यावेळची शंभराची नोट आतापेक्षा किती मोठी होती नाही?"

फार विनोदी नाही, खूप हुरहुर लावणारी नाही तरीसुद्धा गोड, मंद सुवास असलेली आठवण-- अशा सुगंधी आठवणी कितीतरी कलाकारांच्या, तंत्रज्ञांच्या मनात जपून ठेवलेल्या सापडतील. मराठी मनाची सांस्कृतिक जडण-घडण जपण्याचा महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रयत्नातला हा एक महत्त्वाचा भाग--'महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सव'. गेली अठ्ठावीस वर्षे सातत्याने चालत असलेला एक सांस्कृतिक उपक्रम. या उपक्रमाच्या यशाचा जमा-खर्च मांडताना अशा कृतार्थ सुखद आठवणी तर हिशेबात घ्याव्या लागतीलच, पण त्याचबरोबर अशासारख्या उपक्रमाच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकताना ज्या अनेक अपेक्षा पुढे येतात, उंचावत जातात, जे अनेक प्रश्न देखील उभे राहतात त्यांचीही नोंद घ्यावी लागेल.



Scanned with OKEN Scanner

या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी गेल्या सत्तावीस स्पर्धांच्या निकालाच्या याद्या जरी पाहिल्या तरी सर्वप्रथम नजरेत भरतात ती मराठी चित्रपटसृष्टीतील पारितोषिक विजेत्या दिग्गजांची नावे : दिग्दर्शन क्षेत्रात श्री. भालजी पेंढारकर, कै. राजा परांजपे, श्री. अनंत माने, कै. राजा ठाकूर, कै. कमलाकर तोरणे, श्री. राजदत्त यांच्यापासून श्री. सत्यदेव दुबे, डॉ. जब्बार पटेल, श्री. दादा कोंडके, श्री. रवींद्र वणकुद्रे यांच्यापर्यंत; अभिनेते, अभिनेत्रीमध्ये कै. गजानन जहागीरदार, श्रीमती सुलोचना, चंद्रकांत, सूर्यकांत, उषाकिरण, कै. डॉ. काशिनाथ घाणेकर, कै. अरुण सरनाईक, चंद्रकांत गोखले, जयश्री गडकर, शरद तळवलकर, रमेश देव, दुर्गाबाई खोटे, निळू फुले, डॉ. श्रीराम लागू यांच्यापासून कै. स्मिता पाटील, यशवंत दत्त, अशोक सराफ, उषा चव्हाण, रंजना यांच्यापर्यंत. अशाच प्रकारे इतरही सर्व क्षेत्रांमध्ये अशी झळाळती नावे या यादीत आहेत की इंग्रजीत ज्याला 'गॅलॅक्सी' असे संबोधले जाते तसले एक झगमगीत तारामंडळ आपल्यापुढे उभे रहाते. दिग्दर्शन, अभिनय, संगीत, लेखन, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामधल्या मराठी सिनेसृष्टीच्या तीन कर्तबगार पिढ्यांचा आलेखच या पारितोषिक विजेत्यांच्या यादीमधून आपल्यासमोर उभा राहतो.

या स्पर्धांच्या पारितोषिक विजेत्या चित्रपटांच्या नावांवर एक नजर टाकली तर मराठी चित्रपट रसिकांच्या मनामध्ये एखाद्या मूल्यवान् ठेवीसारख्या जपून ठेवलेल्या अनेक कलाकृती डोळ्यांसमोर येतात. पहिल्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवातील सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून गौरविला गेलेला "प्रपंच", दुसऱ्या क्रमांकावरील "सुवासिनी", दुसऱ्या महोत्सवातील "हा माझा मार्ग एकला", तिसऱ्या महोत्सवातील "छोटा जवान" आणि "पाठलाग", यांच्यापासून दहाव्या महोत्सवातील "शांतता, कोर्ट चालू आहे", तेराव्या महोत्सवातील "सामना", सोळाव्या महोत्सवातील "देवकीनंदन गोपाला" आणि "जैत रे जैत", त्यानंतरच्या "सिंहासन", "उंबरठा", "शापित" या चित्रपटांच्या नुसत्या नावातही प्रत्येक मराठी चित्रपट रसिकांच्या मनात सुखद कलानुभवाच्या स्मृती जागृत करण्याचे सामर्थ्य आहे. ही कालची नावे पाहिली की आजकाल दूरदर्शनवर दुपारी प्रादेशिक चित्रपटांच्या राष्ट्रीय कार्यक्रमात इतर भाषा भगिनींचे उत्कृष्ट कलात्मक चित्रपट पाहिल्यावर मराठी चित्रपट रसिकांच्या मनाला येणारी प्रासंगिक हुरहुर थोडी दूर व्हायला मदत होते.

कालच्या आणि परवाच्या मराठी चित्रपट इतिहासाकडे एक धावती नजर या सत्तावीस महोत्सवांच्या आधारे टाकली तर रसिक मन आशावादी होईल असे वाटते. कारण उद्याच्या आशा-आकांक्षांचा पाया शेवटी कालच्या कर्तृत्वावर, अनुभवावरच असतो. "पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काल" ही कवीची उक्ती आशावादी असली तरी संपूर्णतः अव्यवहारी निश्चित नाही. या आशावादी मनस्थितीतून मराठी चित्रपटसृष्टीचा उद्याचा विचार करतानाही आजच्यापेक्षा या क्षेत्रात उद्या काहीतरी अधिक चांगले, अधिक वेगळे घडावे अशी तीव्र इच्छा मात्र मनात आल्याशिवाय रहात नाही. आजच्या मराठी चित्रपटांचे परीक्षण करून त्यावर निर्णय घेण्याची ही जागा नव्हे. स्पर्धेसाठी परीक्षक आवश्यक असतात, ते पारितोषिकाबद्दल निर्णयही देतात. एवढा भाग सोडल्यास मराठी चित्रपटसृष्टीचे परीक्षण शासनाने करावे असा हेतूही महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाच्या मागे नाही. एका वर्षाच्या कालावधीत मराठी चित्रपटसृष्टीत झालेली सर्व नव-निर्मिती एका ठिकाणी यावी, त्यातून ज्येष्ठ आणि श्रेष्ठ तज्ज्ञांनी सर्वोत्कृष्ट अशी निवड करावी, सात प्रदर्शनीय चित्रपटांची निवड करावी आणि या सर्व उपक्रमाद्वारे गेलेल्या वर्षाची उजळणी होऊन त्यातून चित्रपटसृष्टीतील कलाकारांना, निर्मात्यांना आणि सर्वच क्षेत्रांतील प्रतिभावंतांना एक नवी दिशा, नवी वाट मिळावी, त्यासाठी आपण निमित्त व्हावे, यजमानपद घ्यावे एवढीच सांस्कृतिक कार्य,



Scanned with OKEN Scanner

विभागाची भूमिका. परीक्षण करण्याची जबाबदारी शेवटी कलाक्षेत्रातील कर्त्या-धर्त्यांवर आहे. कारण सर्वांत उत्तम परीक्षण म्हणजे शेवटी आत्मपरीक्षण.

या पार्श्वभूमीवर अठ्ठाविसाव्या चित्रपट महोत्सवाकडे पाहिले की निश्चित आणि स्पष्ट असा आशेचा किरण दिसतो. व्यक्तिजीवनात काय किंवा समाजजीवनात काय किंवा कलाक्षेत्रात काय, विशिष्ट कालामध्ये एखादी विशिष्ट प्रवृत्ती काही कालावधीत स्थिरावते. तसेच काहीसे मराठी चित्रपटसृष्टीतील स्थिती गेल्या काही वर्षांत झाल्यासारखी वाटत होती आणि माझ्यासारख्या जीवनवादी कला रसिकाला भालजी पेंढारकरांच्या चित्रपटातील "साधी माणसं", मराठी माणसं मराठी चित्रपटाच्या पडद्यावर परत कधी दिसतील अशी हुरहुर वाटण्याची शक्यता निर्माण झाली होती. या वर्षाच्या प्रथम पारितोषिक विजेत्या श्री. रमाकांत कवठेकर यांच्या "आघात" चित्रपटाने ही हुरहुर बरीचशी दूर केली आहे.

या आशादायी वातावरणात सुरुवातीला दिलेली छोटी गोष्ट परत आठवून वाटते की, आणखी २५ वर्षांनी आजची बालकलाकार मृण्मयी मोठी झाली असेल त्याबरोबर तिची कला, तिचे यश तर अधिक मोठे झाले असेलच, पण हा मराठी चित्रपट महोत्सवाचा उपक्रमही अधिक मोठा झाला असेल.

त्यावेळी शंभराच्या नोटा आजच्याहूनही थोड्या अधिक लहान झाल्या असण्याची शक्यता नाकारता येत नसली, तरी मराठी चित्रपटातील कलामूल्ये मात्र अधिक मोठी झाली असतील, अशी आशा करावयास जागा आहे.

—— रवींद्र सुर्वे



Scanned with OKEN Scanner

# स्पर्धेसाठी दाखल झालेले चित्रपट/माहितीपट

| | | |
|---|---|---|
| (१) | गोडीगुलाबी | व्ही. के. प्रॉडक्शन, मुंबई |
| (२) | अफलातून | भाविका चित्र, मुंबई |
| (३) | पळवापळवी | ज्योती पिक्चर्स, मुंबई |
| (४) | इजा बिजा तिजा | सखी इंटरप्राइजेस, मुंबई |
| (५) | धडाका | छत्रपती प्रॉडक्शन, मुंबई |
| (६) | भीमगर्जना | विक्रांत चित्र इंटरनॅशनल, मुंबई |
| (७) | शुभ बोल नाऱ्या | श्रीमहालक्ष्मी सहकारी चित्र संस्था, कोल्हापूर |
| (८) | तुझी माझी जमली जोडी | यशवंत विलास चित्र, मुंबई |
| (९) | थांब थांब जाऊ नको लांब | व्ही. एन. पी. के. प्रॉडक्शन, कोल्हापूर |
| (१०) | आघात | वरद चित्र, पुणे |
| (११) | आमच्यासारखे आम्हीच | श्रीतिरुपती बालाजी चित्र, मुंबई |
| (१२) | धडाकेबाज | जेनमा फिल्म्स इंटरनॅशनल, मुंबई |
| (१३) | शेजारी शेजारी | अमोल प्रॉडक्शन, कल्याण |
| (१४) | दे धडक बेधडक | दिलीपराज चित्र, पुणे |
| (१५) | कुठं कुठं शोधू मी तिला | जय श्रीसिद्धीविनायक चित्र, मुंबई |
| (१६) | धमाल बाबल्या गणप्याची | पद्मावती सिने कॉर्पोरेशन, मुंबई |
| (१७) | धुमाकूळ | कौशिक चित्र, सातारा |
| (१८) | एकापेक्षा एक | श्री तुलसी प्रॉडक्शन, मुंबई |
| (१९) | डोक्याला ताप नाही | विशाखा चित्र, मुंबई |
| (२०) | कुलदीपक | इगल इंटरनॅशनल इंटरप्राईजेस, मुंबई |
| (२१) | एक रात्र मंतरलेली | कुसो फिल्म्स, मुंबई |

## माहितीपट

| | | |
|---|---|---|
| (१) | विकासाचा दुवा | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई |
| (२) | पिण्याचे पाणी—भगीरथ प्रयत्न | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई |



Scanned with OKEN Scanner

# महोत्सवासाठी निवडलेले चित्रपट

| चित्रपटाचे नाव | संस्थेचे नाव |
| --- | --- |
| (१) आघात | वरद चित्र, पुणे |
| (२) एकापेक्षा एक | श्री तुलसी प्रॉडक्शन, मुंबई |
| (३) कुलदीपक | इगल इंटरनॅशनल इंटरप्राईजेस, मुंबई |
| (४) आमच्यासारखे आम्हीच | श्रीतिरुपती बालाजी चित्र, मुंबई |
| (५) तुझी माझी जमली जोडी | यशवंत विलास चित्र, मुंबई |
| (६) एक रात्र मंतरलेली | कुसो फिल्म्स, मुंबई |
| (७) शेजारी शेजारी | अमोल प्रॉडक्शन, कल्याण |



Scanned with OKEN Scanner

# पारितोषिक विजेते चित्रपट

## अठ्ठाविसाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवातील पारितोषिक विजेते

२८ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवासाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या काळात सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉरने संमत केलेल्या पूर्ण लांबीच्या चित्रपटाच्या एकूण २१ प्रवेशिका व माहितीपटाच्या २ प्रवेशिका आल्या होत्या. व त्या सर्व प्रत्यक्ष महोत्सवामध्ये दाखविण्यात आल्या. उपरोक्त चित्रपट शासननियुक्त परीक्षक मंडळांनी पाहून खालीलप्रमाणे चित्रपटांना, कलाकार आणि तंत्रज्ञांना पारितोषिके जाहीर करण्यात आली :—

(१) सर्वोत्कृष्ट चित्रपट : " **आघात** ", **वरद चित्र**, पुणे
निर्माता : (१) **श्री. पद्माकर जातेगावकर**
(२) **सौ. सुचित्रा र. कवठेकर**
रु. ५०,००० व मानचिन्ह, कै. दादासाहेब फाळके पारितोषिक
दिग्दर्शक : **रमाकांत कवठेकर**, रु. १५,००० व मानचिन्ह

(२) उत्कृष्ट चित्रपट क्र. २ : " **एकापेक्षा एक** ", **तुलशी प्रॉडक्शन**, मुंबई
निर्माता : **श्री. सतीश कुळकर्णी**, रु. ३०,००० व मानचिन्ह, कै. बाबूराव पेंटर पारितोषिक
दिग्दर्शक : **श्री. सचिन पिळगांवकर**, रु. ११,००० व मानचिन्ह

(३) उत्कृष्ट चित्रपट क्र. ३ : " **कुलदीपक** ", **इगल इंटर-नॅशनल एंटरप्रायजेस**, मुंबई
निर्माता : **श्री. एस. पी. अहलूवालिया**, रु. २०,००० व मानचिन्ह, कै. मास्टर विनायक पारितोषिक
दिग्दर्शक : **श्री. एन. एस. वैद्य**, रु. ७,००० व मानचिन्ह

(४) सामाजिक प्रश्न हाताळणारा उत्कृष्ट चित्रपट : " **आघात** ", **वरद चित्र**, पुणे, रु. ३०,००० व मानचिन्ह

(५) उत्कृष्ट कथा : **श्री. रमाकांत कवठेकर**, रु. ५,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आघात** "

(६) उत्कृष्ट पटकथा : **श्री. रमाकांत कवठेकर**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आघात** "

(७) उत्कृष्ट अभिनेता : **श्री. प्रमोद पवार**, रु. ५,००० व मानचिन्ह तसेच रु. १,००० शिवाजी गणेशन पारितोषिक, चित्रपट " **आघात** "

(८) उत्कृष्ट अभिनेत्री : **श्रीमती निवेदिता जोशी-सराफ** रु. ५,००० व मानचिन्ह, चित्रपट " **तुझी माझी जमली जोडी** "

(९) विशेष अभिनेता : **श्री. प्रशांत सुभेदार**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **कुलदीपक** "

(१०) विशेष अभिनेत्री : **श्रीमती आशा पाटील**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **थांब थांब जाऊ नको लांब** "

(११) उत्कृष्ट गीते : **श्री. रमण रणदिवे**, रु. ३,००० चे ग. दि. माडगुळकर पारितोषिक व मानचिन्ह, चित्रपट " **आघात** " (**रोज नवा आघात . . . .**)

(१२) उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक : **श्री. भास्कर चंदावरकर**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आघात** "

(१३) उत्कृष्ट पार्श्वगायक : **श्री. सुरेश वाडकर**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आघात** " (**रोज नवा आघात. . .**)

(१४) उत्कृष्ट पार्श्वगायिका : **सौ. अनुराधा पौडवाल**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आमच्यासारखे आम्हीच** " (**रात्र आहे रेशमाची येना . . . .**)

(१५) उत्कृष्ट छायालेखक (रंगीत) : **श्री. सूर्यकांत लवंदे**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **एक रात्र मंतरलेली** "

(१६) उत्कृष्ट ध्वनिमुद्रक : **श्री. प्रदीप देशपांडे**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **शेजारी शेजारी** "

(१७) उत्कृष्ट संकलन : **श्री. अशोक पटवर्धन**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **एक रात्र मंतरलेली** "

(१८) उत्कृष्ट कलादिग्दर्शक (रंगीत) : **श्री. रमाकांत कवठेकर**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आघात** "

(१९) उत्कृष्ट वेशभूषा : **प्रज्ञा भुरे, अनिल खन्ना व उदय टेलर्स**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आमच्यासारखे आम्हीच** "

(२०) उत्कृष्ट जाहिरात : **श्री. कमल शेडगे**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **एक रात्र मंतरलेली** "

(२१) उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक : **श्री. माधवकिशन व श्री. विजय बोन्हाडे**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **आमच्या-सारखे आम्हीच** "

(२२) उत्कृष्ट बालकलाकार : **कु. आराधिता**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **कुलदीपक** "

(२३) उत्कृष्ट रंगभूषाकार : **श्री. मोहन पाठारे**, रु. ३,००० व मानचिन्ह, चित्रपट " **एकापेक्षा एक** "



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट चित्रपट क्रमांक पहिला

## कै. दादासाहेब फाळके पारितोषिक विजेता चित्रपट



कै. दादासाहेब फाळके

प्राथमिक शिक्षण जातेगांव येथे व तदनंतर इंजिनिअरिंग महाविद्यालय, पुणेमधून बी.ई. (सिव्हील) ही परीक्षा उत्तीर्ण. नोकरीपेक्षा स्वतःचा काहीतरी व्यवसाय करायचा या प्रेरणेने बांधकाम व्यवसाय सुरु केला. सुमारे १० वर्षे पुण्यातील अनेक ठिकाणी वास्तुशिल्प उभारण्यात यशस्वी, त्याचबरोबर अनेक मान्यवर सामाजिक संस्थांबरोबर विविध उपक्रमांत सक्रीय भाग.



श्री. पद्माकर जातेगांवकर
निर्माता
"आघात"



वरद चित्र, पुणेच्या "आघात" चित्रपटात




# उत्कृष्ट चित्रपट क्रमांक तिसरा

## कै. मास्टर विनायक पारितोषिक



कै. मास्टर विनायक

जन्म पंजाबमध्ये झाला. तेथेच शिक्षण झाले. भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी भारतात आले. "गुन्हेगार" व "दौलत का नशा" या हिंदी चित्रपटांची निर्मिती; तसेच "घरचा भेदी" आणि "गडबड घोटाळा" या मराठी चित्रपटांची निर्मिती.



श्री. एस. पी. अहलूवालिया
निर्माता
"कुलदीपक"



इंटरनॅशनल एंटरप्राईजेस, मुंबई चित्रच्या "कुलदीपक" चित्रपटात



Scanned with OKEN Scanner

# सामाजिक प्रश्न हाताळणारा सर्वोत्कृष्ट चित्रपट



श्री. पद्माकर जातेगांवकर
निर्माता
" आघात "



वरद चित्र, पुणेच्या " आघात " चित्रपटात



Scanned with OKEN Scanner

# सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक



श्री. रमाकांत कवठेकर
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक
"आघात"
प्रथम पारितोषिक



# सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक



श्री. सचिन पिळगांवकर
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक
" एकापेक्षा एक "
द्वितीय पारितोषिक

"हा माझा मार्ग एकला" या चित्रपटात बालकलाकार म्हणून ५ व्या वर्षी पदार्पण केले. या बालकलाकाराच्या भूमिकेसाठी राष्ट्रीय पारितोषिक व महाराष्ट्र शासनाचे खास पारितोषिक मिळविले. हिंदी-मराठी १५० पेक्षा जास्त चित्रपटातून काम केले. 'अपराध मीच केला' नाटकांत बालकलाकार म्हणून चमकला आहे. आतापर्यंत १० मराठी चित्रपटांचे दिग्दर्शन केले. 'आत्मविश्वास' चित्रपटाची निर्मिती.



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक



श्री. एन. एस. वैद्य
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक
“ कुलदीपक ”
तृतीय पारितोषिक

“ इन्फमशन फिल्म्स् ऑफ इंडियात ” सहाय्यक संकलक म्हणून कामाची सुरुवात. स्वतंत्रपणे संकलक म्हणून काम करण्याची पहिली संधी १९५२ मध्ये “ माशुका ” या हिंदी चित्रपटात मिळाली. आतापर्यंत ७६ मराठी, ६ हिंदी व ३ गुजराथी चित्रपटांचे संकलन केले. सर्वोत्कृष्ट संकलक म्हणून आतापर्यंत महाराष्ट्र शासनाकडून आठ चित्रपटांस पारितोषिके मिळालेली आहेत.



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट अभिनेता-अभिनेत्री



श्री. प्रमोद पवार
उत्कृष्ट अभिनेता
" आघात "

१९७३ " भारत दर्शन " या नृत्यनाट्यापासून रंगभूमिवर पदार्पण. महाराष्ट्र शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेत उदय कला केंद्रातर्फे सादर केलेल्या " अश्वमेघ " या नाटकातील भूमिकेबद्दल प्रशस्तीपत्र, तसेच " आतंक व अव्यक्त " या नाटकास दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक. शासनातर्फे आयोजित केलेल्या प्रथम व्यावसायिक नाट्यस्पर्धेमध्ये " टिळक आणि आगरकर " या नाटकातील टिळकांच्या भूमिकेबद्दल रौप्यपदक. महाराष्ट्र शासनाच्या २६ जानेवारी १९८८ रोजी दिल्लीत झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात चित्ररथावर लोकमान्य टिळकांची भूमिका. या चित्ररथास राष्ट्रीय पातळीवर द्वितीय पारितोषिक.

" हे बंध रेशमाचे " या नाटकात प्रथम बालकलाकार म्हणून रंगमंचावर पदार्पण. मान्यवर नाट्यसंस्थांनी सादर केलेल्या नाटकांतून भूमिका केल्या. दूरदर्शन-वरील हिंदी-मराठी मालिकांमधून भूमिका. २३ मराठी चित्रपटांत आणि ८ हिंदी चित्रपटांत भूमिका केल्या.




श्रीमती निवेदिता जोशी-सराफ
उत्कृष्ट अभिनेत्री
" तुझी माझी जमली जोडी "



Scanned with OKEN Scanner

# विशेष अभिनेता-अभिनेत्री



श्री. प्रशांत सुभेदार
विशेष अभिनेता
" कुलदीपक "

श्रीमती आशा पाटील
विशेष अभिनेत्री
" थांब थांब जाऊ नकोस लांब "



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट गीते-संगीत



श्री. रमण रणदिवे
उत्कृष्ट गीत
" आघात "

वयाच्या १५ व्या वर्षापासून कविता लेखनास प्रारंभ. अनेक मासिकांतून, साप्ताहिकांतून कविता प्रसिद्ध. गझल लेखनात विशेष अभिरुची. पहिल्याच चित्रपटास गीतलेखनाचा ग. दि. माडगूळकर पुरस्कार.

श्री. भास्कर चंदावरकर
उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक
" आघात "



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक-पार्श्वगायिका



श्री. सुरेश वाडकर
उत्कृष्ट पार्श्वगायक
" आघात "

मराठी आणि हिंदी चित्रपटांतील सध्याचा आघाडीचा पार्श्वगायक. वयाच्या दहाव्या वर्षापासून गायन क्षेत्रात पदार्पण करून आपल्या दमदार आणि सुरेल आवाजाने रसिक श्रोत्यांना त्यांनी मोहित करून टाकले आहे. १९७६ मध्ये पार्श्वगायक म्हणून आयुष्याची नवी सुरुवात आणि १९७७ मध्ये "पहेली" चित्रपटातील पहिल्याच गीत गायनाला उत्कृष्ट उगवता पार्श्वगायक म्हणून पारितोषिक. आतापर्यंत हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत संगीत दिग्दर्शकांच्या मार्गदर्शनाने त्यांनी सुमारे तीन हजारांवर गीते मराठी, हिंदी, पंजाबी, गुजराथी, इत्यादी भाषांत गायिली आहेत. केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, फिल्मफेअर, सूरसिंगार, गुजराथ शासन, इत्यादींकडून अनेक बक्षिसे मिळविणाऱ्या सुरेशने जर्मन, ऑस्ट्रिया, हॉलंड, फ्रान्स, इंग्लंड आणि स्कॉटलंड, इत्यादी विदेशांतील संगीत रसिकांनाही आपल्या गायनाची मोहिनी घातली आहे.

श्रीमती अनुराधा पौडवाल यांनी बालपणापासून संगीताचे धडे घेतले. शाळा आणि कॉलेजमध्ये संगीताविषयी अनेक पुरस्कार मिळाल्यानंतर व्यावसायिक क्षेत्रात पार्श्वगायिका म्हणून पदार्पण. श्रीमती पौडवाल यांनी आजतागायत पाच हजारांच्यावर गीते गायिलेली आहेत. त्यांत भजन, भावगीते, गजल, श्लोक, स्तोत्र आणि मंत्र, इत्यादींचा समावेश आहे. त्यांना या कामी पं. जसराज, पं. राम नारायण, स्वर्गीय पंडीत मोहन यांच्याकडून योग्य ते मार्गदर्शन मिळाले. अमेरिका, जपान, जर्मनी, हॉलंड, वेस्ट इंडीज, इत्यादी ठिकाणी श्रोत्यांना आपल्या सुश्राव्य गायनाने मंत्रमुग्ध केले आहे. तत्कालीन पंतप्रधान मा. राजीव गांधी यांच्याकडून त्यांना सुरसिंगार संसदचे आणि सिटीजन ॲवार्ड मिळालेले आहे. एकोणिसाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात "अरे संसार संसार" चित्रपटातील पार्श्वगायनासाठी व विसाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात "एक डाव भुताचा" या चित्रपटातील पार्श्वगायनासाठी पारितोषिक मिळाले होते.



श्रीमती अनुराधा पौडवाल
उत्कृष्ट पार्श्वगायिका
"आमच्यासारखे आम्हीच"



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट कथा–पटकथा



श्री. रमाकांत कवठेकर
उत्कृष्ट कथा आणि उत्कृष्ट पटकथा लेखक
" आघात "
दोन पारितोषिके



Scanned with OKEN Scanner

# सर्वोत्कृष्ट जाहिरात



श्री. कमल शेडगे
“ एक रात्र मंतरलेली ”

अनेक मान्यवर नाटयसंस्थांसाठी जाहिरातींची डिझाइन्स करीत आहेत. पुस्तकांची तसेच दिवाळी अंकांची मुखपृष्ठे सजवली आहेत. मुंबई, पुणे या ठिकाणी “ अक्षर प्रदर्शने ” भरविली आहेत. “ एक रात्र मंतरलेली ” या पहिल्याच चित्रपटाच्या जाहिरातीला पारितोषिक.



Scanned with OKEN Scanner

# सर्वोत्कृष्ट बालकलाकार आणि
# कै. गजानन जहागीरदार पारितोषिक



कु. आराधिता
उत्कृष्ट बालकलाकार
" कुलदीपक "



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट कला आणि तंत्र



श्री. अशोक पटवर्धन
सर्वोत्कृष्ट संकलक
" एक रात्र मंतरलेली "

चित्रपट व्यवसायामध्ये १८ वर्षे संकलक म्हणून कार्यरत. आतापर्यंत सुमारे ५०० जाहिरातपट, १८ माहितीपट, १७ पूर्ण लांबीचे चित्रपट व ६ दूरदर्शनपट हिंदी व मराठी भाषेमध्ये संकलित केले.

"हेच माझे माहेर", "प्रेम करुया खुल्लम खुल्ला", "एक रात्र मंतरलेली" या चित्रपटांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळालेली आहेत. तसेच वरील चित्रपटांबरोबरच "अर्धांगी", "रंगतसंगत", "अॅन्टी-डावरी (जाहिरातपट)", "कुली (अॅरीस्ट्रोक्रॅट लगेज)" हे चित्रपट "उत्कृष्ट चित्रपट" म्हणून गौरविण्यात आले आहेत.



श्री. मोहन पाठारे
उत्कृष्ट रंगभूषाकार
" एकापेक्षा एक "

सन १९७० पासून चित्रपटांमध्ये रंगभूपाकार म्हणून कारकीर्द सुरू केली. आजपर्यंत मराठी व हिंदी मिळून पन्नासपेक्षा जास्त चित्रपटांकरिता रंगभूपाकाराची उत्कृष्ट कामगिरी बजावली. दूरदर्शनवरील "ये जो है जिंदगी" आणि "घरकुल" मालिकांचे रंगभूपाकार म्हणून संधी मिळाली.



Scanned with OKEN Scanner



**वेशभूषा**
**प्रज्ञा भुरे**

**विभागून**

**“ आमच्यासारखे आम्हीच ”**

**वेशभूषा**
**अनिल खन्ना**

प्रज्ञा भुरे या राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांच्या अभ्यासक असून सध्या स्वतःचा स्क्रीन प्रिंटींगचा व्यवसाय चालवतात. कथ्थकचे शिक्षण त्यांनी घेतलेले असून ‘अस्करा’ ह्या नृत्यसंस्थेबरोबर इंग्लंड आणि अमेरिकेचा नृत्यदौराही त्यांनी केलेला आहे. ह्या संस्थेच्या त्या सहकार्यवाहही आहेत. ‘आंतरनाट्य’ च्या “अनाहत” या पारितोषिक विजेत्या नाटकाची वेशभूषा करून त्यांनी ह्या क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर “वृक्षवल्ली आम्हां. . . .” या ‘आविष्कार’च्या नृत्यनाट्याची वेशभूषाही त्यांनी केली. “प्रीती परि तुजवरती” या नाटकाच्या वेशभूषेतही त्यांचा सहभाग होता. ह्यानंतर स्वतंत्रपणे पोशाखनिर्मिती हा जोडव्यवसाय करीत असतानाच त्यांनी मराठी चित्रपटांकरिता वेशभूषा करणे सुरू केले आणि “घरचा भेदी”, “नवरा बायको”, “मालमसाला” अशा चित्रपटांकरिता काम केले.

प्रदीप सालियन, वय वर्षे २८ हे गेली ८–१० वर्षे चित्रपट आणि नाटकांतून वेशभूषेचे काम करतात. त्यांनी “आमच्यासारखे आम्हीच”, “आत्मविश्वास”, “गंमत जंमत”, “वनवावनवी” इत्यादी चित्रपटांमध्ये त्याचप्रमाणे “षडयंत्र”, “लफडा सदन” इत्यादी नाटकांमध्ये वेशभूषेचे काम केले. आता त्यांनी हिंदी चित्रपटांमध्ये पदार्पण केले.



**वेशभूषा**
**श्री. प्रदीप सालियन (उदय टेलर्स)**



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट कला आणि तंत्र



श्री. रमाकांत कवठेकर
उत्कृष्ट कला दिग्दर्शक
" आघात "



श्री. प्रदीप देशपांडे
उत्कृष्ट ध्वनिमुद्रक
" शेजारी शेजारी "

आपल्या कारकिर्दीची सुरुवात रंगभूमीवर केली. आतापर्यंत नाटचक्षेत्र विभाग, एस. एल. रेकॉर्डिंग स्टुडिओ, इंडियन नॅशनल थिएटर (ऑडिओ व व्हिडीओ विभागाचे प्रमुख) येथील अनुभव आहे. दूरदर्शनवर संगीतवादनाचे कार्यक्रम केलेले आहेत. तसेच दूरदर्शन मालिका व माहितीपट ध्वनिमुद्रित केले आहेत. " सूर्योदय " व " शेजारी शेजारी " या चित्रपटांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळाली आहेत.



Scanned with OKEN Scanner

गेली पंचवीस वर्षे मराठी चित्रपटसृष्टीमध्ये चलत्छाया लेखनकार म्हणून काम करीत असून ७० ते ८० मराठी चित्रपटांचे छायालेखन केले आहे. १४ ते १५ चित्रपट रौप्यमहोत्सवी झाले असून "धडाकेबाज" हा पहिलाच फोर ट्रॅक स्टीरियोफोनिक साऊंड सिनेमास्कोप मराठी चित्रपट त्यांच्याकडूनच छायाचित्रीत झाला आहे.

आतापर्यंत "सामना", "सिंहासन", "सासुरवाशीण", "अर्धांगी", "गंमतजंमत" व "एक रात्र मंतरलेली" या चित्रपटांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळाली आहेत. अजून बऱ्याच चित्रपटांचे छायालेखन करण्याची जिद्द आहे.



श्री. सूर्यकांत लवंदे
उत्कृष्ट छायालेखक
"एक रात्र मंतरलेली"



Scanned with OKEN Scanner



# सर्वोत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक



श्री. माधव किशन
उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक

विभागून

श्री. विजय बोऱ्हाडे
उत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक

माधव किशन हे मूळचे वाराणशी (उ. प्र.) चे राहाणारे, श्री. गोपीकृष्ण यांचे लहान बंधू व सितारादेवी यांचे भाचे. त्यांना लहानपणापासून नृत्याची आवड असल्याने कलकत्ता, अलाहाबाद, बनारस इत्यादी शहरांतून कॉन्फरन्समधून कार्यक्रम केले आहेत. तसेच कमीत कमी २०० चित्रपटांतून नृत्य दिग्दर्शनाचे काम केले. सर्वात प्रथम "पुतळीबाई" या चित्रपटात नृत्य दिग्दर्शनाचे काम केले.




Scanned with OKEN Scanner

# परीक्षक मंडळ



श्रीमती आशा जोगळेकर, श्रीमती ज्योती किरण, श्रीमती कुंदा भगत, श्री. स्नेहल भाटकर
श्री. रामाराव घाटगे, श्री. दया पवार, श्री. एम. डब्ल्यू. मुकादम, श्री. पंढरी ह. जुकर



श्री. पांडुरंग कोठारे, श्री. दामू केंकरे, श्री. शं. ना. नवरे, श्री. विकास देसाई, श्री. के. एस. राणे,
श्री. नंदकिशोर कलंगुटकर, श्री. दिलीप जामदार, श्री. शंकर वैद्य



Scanned with OKEN Scanner

# चित्रपट सृष्टीचे तीन महर्षी



**कै. दादासाहेब फाळके**

दादासाहेब तथा धुंडीराज गोविंद फाळके या भारतीय चित्रपटसृष्टीच्या जनकाचा जन्म नाशिक-जवळील त्र्यंबकेश्वर येथे एका भिक्षुक कुटुंबात ३० एप्रिल १८७० रोजी झाला. त्यानंतर त्यांनी मुंबईत प्राथमिक शिक्षण संपवून चित्रकलेचे शिक्षण संपादन केले. पुढे फोटोग्राफीचे शिक्षण व जादूकलेचे शिक्षण घेतले.

१७ मे १९१३ रोजी 'राजा हरिश्चंद्र' या भारताच्या पहिल्या चित्रपटाची फाळके फिलमस्तर्फे त्यांनी निर्मिती केली. ही निर्मिती मुंबई व नाशिक येथे करण्यात आली होती.

त्यानंतर त्यांनी नाशिकला स्थलांतर केले आणि 'भस्मासुर मोहिनी' हा दुसरा चित्रपट तयार केला. १९१४ साली "सत्यवान सावित्री" हा तिसरा चित्रपट त्यांनी काढला. १९१७ साली "लंकादहन" काढला. १९१८ साली हिंदुस्थान फिल्म कंपनीची स्थापना. पहिला चित्रपट "श्रीकृष्ण जन्म" हा होय.

दादासाहेब फाळके ह्यांनी एकूण ४६ मूकपट व 'गंगावतरण' हा एकमेव बोलपट काढला. त्याशिवाय त्यांनी २० लघुपट निर्माण केले. त्यात विनोदी, जादूविषयक, प्रवासपट, माहितीपट, औद्योगिक असे अनेक प्रकारचे लघुपट होते.

१९२० साली भागीदारांशी मतभेद झाल्यामुळे हिंदुस्थान फिल्म कंपनी सोडून चित्रपट व्यवसायाला त्यांनी रामराम ठोकला व काशीला प्रयाण केले. पण परत १९२३ मध्ये कंपनीच्या भागीदारांशी समझोता होऊन चित्रपट व्यवसायात पुनरागमन केले. १९३१ ते १९३३ मध्ये "सेतुबंधन" या चित्रपटाची निर्मिती व त्या चित्रपटाचे "सिंक्रोनाइझिंग" करून बोलपटात रूपांतर केले. १९३५ मध्ये कोल्हापूर सिनेटोनसाठी "गंगावतरण" हा आपला पहिला बोलपट दादासाहेबांनी तयार केला. १९३७ मध्ये मुंबईच्या रॉयल ऑपेरा हाऊसमध्ये "गंगावतरण" चे प्रदर्शन झाले. त्यानंतर चित्रपट व्यवसायास त्यांनी रामराम ठोकला व कोरेगाव येथे प्रयाण केले.

१९४२ साली नाशिक येथील 'हिंद सिनेजन आश्रम' या स्वतःच्या बंगल्याचे बांधकाम पूर्ण करून त्या बंगल्यात दादासाहेब रहावयाला गेले. १६ फेब्रुवारी १९४४ ला वयाच्या ७४ व्या वर्षी नाशिक येथे त्यांचे निधन झाले.



Scanned with OKEN Scanner



**कै. बाबूराव पेंटर**

कलात्मक सिनेमाचे प्रवर्तक म्हणून बाबूराव पेंटर यांचे नाव घ्यावे लागेल. सिनेमा ही एक प्रेक्षणीय कला बनू शकते हे बाबूराव पेंटर ह्यांनी दाखवून दिले. बाबूराव पेंटर यांचे मूळ नाव बाबूराव कृष्णराव मेस्त्री हे होय. चित्रकाराला पूर्वी पेंटर म्हणून संबोधीत असत. आणि बाबूराव तर मूळचे चित्रकार. त्यामुळे त्यांचे मूळ आडनाव मेस्त्री हे लोप पावून पेंटर हे व्यावसायिक नाव त्यांना चिकटले. बाबूरावांचा जन्म कोल्हापूरचा. त्यांचे मूळ गाव इचलकरंजी जहागिरीमधील आजरे तालुक्यातील म्हागोंड हे होय. दिनांक ३ जून १८६० हा त्यांचा जन्मदिन.

त्यांचे चुलतबंधू आनंदराव मेस्त्री व स्वतः बाबूराव हे जातिवंत चित्रकार असल्याने त्यांनी ललित-कलादर्श व गंधर्व नाटक मंडळी यांचे सीनसीनरीचे पडदे रंगविले होते.

१ डिसेंबर १९१७ रोजी बाबूरावांनी महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना केली. त्याआधी त्यांनी स्वतः तयार केलेल्या देशी कॅमेऱ्यावर काँग्रेस अधिवेशनावर एक लघुपट तयार केला होता. लोकमान्य टिळकांनी त्यांना "सिनेमा केसरी" ही पदवी बहाल केली होती.

महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या निशाणावर बाबूरावांनी 'सैरंध्री' हा चित्रपट प्रथम काढला. हा अर्थातच मूकपट होता. 'सैरंध्री' नंतर त्यांनी जवळजवळ १८ मूकपट दिग्दर्शित केले. पुढे महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडल्यानंतर त्यांनी "प्रेम संगम" हा मूकपट काढल्यानंतर मूकपटांना रामराम ठोकून त्यांनी आपला मोर्चा बोलपटांकडे वळविला.

"उषा, सावकारी पाश, प्रतिभा, अमृतसिद्धी, रुक्मिणी स्वयंवर, रामजोशी, विश्वमित्र" आदी सात बोलपट दिग्दर्शित केले.

परंतु बाबूराव मूकपटात जसे रमले तसे बोलपट युगात रमलेले दिसत नाहीत. त्यांना बोलपटातील भरमसाठ संवादबाजीचा राग येत असे. सिनेमा ही कॅमेऱ्याची भाषा. तेव्हा जरूर पडेल तिथेच संवाद घालावेत असे त्यांचे मत होते.

१६ जानेवारी १९५४ रोजी बाबूरावांचे निधन झाले.



Scanned with OKEN Scanner



**कै. मास्टर विनायक**

मराठी बोलपटांचे त्यांतल्या त्यात मराठी सामाजिक आणि विनोदी बोलपटांचे एक प्रवर्तक म्हणून मास्टर विनायक यांचे नाव कुणालाही घ्यावे लागेल.

मराठी सिनेमा जेव्हा पौराणिक, ऐतिहासिक व काल्पनिक अद्‌भुतरम्य सिनेमात अडकून पडला होता त्यावेळेस मास्टर विनायकांसारखा एक द्रष्टा, साहित्याची आवड असणारा, कलाप्रेमी दिग्दर्शक मराठी सिनेमाला लाभला.

सुरुवातीला मास्टर विनायक कोल्हापूरच्या विद्यापीठ ह्या शिक्षणसंस्थेत मास्तर होते. विनायकराव कर्नाटकी मास्तर भाषा विषय विद्यार्थ्यांना चांगला शिकवीत. काव्य हा विषय तर ते अगदी समरसून शिकवीत. शब्द व अभिनय यांच्या जोडीने ते कविता शिकवावयाला लागले की तासाची घंटाच होऊ नये असे वाटे.

आणि म्हणूनच १९३१-३२ च्या सुमाराला जेव्हा बोलपटांचे युग सुरू झाले, तेव्हा "अयोध्येचा राजा" या प्रभात फिल्म कंपनीच्या पहिल्या बोलपटात त्यांना नारदाची भूमिका मिळून त्यांचे सिनेमात एक नट म्हणून पदार्पण झाले.

"अयोध्येचा राजा" नंतर त्यांनी "अग्निकंकण, मायामच्छिंद्र, सैरंध्री, सिंहगड" या प्रभात चित्रात आणि "आकाशवाणी, भिकारन", ह्या कोल्हापूर सिनेटोनच्या चित्रपटांतून भूमिका केल्या.

कोल्हापूर सिनेटोनच्या "विलासी ईश्वर" या मराठीतील पहिल्या सामाजिक चित्रपटाने त्यांच्या दिग्दर्शनकलेचा ओनामा घातला गेला. आणि तेव्हापासून मास्टर विनायक नट आणि दिग्दर्शक म्हणून कधीच मागे फिरले नाहीत.

१९३६ मध्ये त्यांनी आपले साथीदार बाबूराव पेंढारकर व पांडुरंगराव नाईक यांच्यासमवेत 'हंस पिक्चर्स'ची स्थापना करून वि. स. खांडेकरांच्या कथानकावरील पहिला बोलपट "छाया" दिला. लागलीच पुढील वर्षी आचार्य अत्रे यांच्या कथानकावरील विनोदी सिनेमा "धर्मवीर" दिला. आणि तेव्हापासून मास्टर विनायक हे गंभीर आणि विनोदी सिनेमाचे दिग्दर्शक म्हणून ओळखण्यात येऊ लागले.

१९ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांचे निधन झाले. तोपर्यंत त्यांनी जवळजवळ २२ चित्रपटांतून भूमिका केल्या व २९ चित्रपट दिग्दर्शित केले.



Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner